
शिवशाही


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. ली.
दा. क्र. १५५६०

# हे तुम्हीच राखावे

## डॉ. म. वि. गोखले



IRBK-0115560



# नाट्यरूप शिवशाही

नाटिका १० वी

संपादक : डॉ. म. वि. गोखले

एम.ए., पीएच.डी

# ‘हे तुम्हीच राखावे!’

(स्त्रीपात्र विरहित ऐतिहासिक नाटिका)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५५८० नों. दि. २५।१।७८
वि. ....... क्र. ...............

लेखक

डॉ. म. वि. गोखले

IRBK-0115560

प्रकाशन क्रमांक १५७

किंमत १ रुपया

सदर नाटिकेचा प्रयोग, वाचन, भाषांतर, रूपांतर, आकाशवाणी चित्रवाणी अशापैकी कोणत्याही प्रकारे उपयोग करण्यापूर्वी रुपये पंधरा फक्त मानधन पाठवून, आगाऊ परवानगी घेणे आवश्यक आहे--

पत्ता :-- सौ. सुसंगति म. गोखले, १९/२७७, लोकमान्यनगर, पुणे ३०

प्रकाशिका : **सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी**
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

C) सर्व हक्क प्रकाशिकेंच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : **सौ. वसुधा रघुनाथ खरे**, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट, नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षापूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुणसागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कारक्षमता—किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्यरूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही '**नाट्यरूप शिवशाही**' निर्माण केली आहे. रंजनाबरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हाला तो आवडेलच आवडेल !

१९/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार— नाट्यरूप शिवशाही

मित्रहो,

श्रीशिवछत्रपतींच्या जीवनकार्याचा परिचय करून घेताना काही वेळा विस्मय वाटावा असे प्रसंग समोर येतात आणि मन थक्क होते! स्वराज्य-संस्थापना हेंच जीवितकार्य मानून श्रीशिवछत्रपतींनी सतत पन्नास वर्षे आपले शरीर आणि मन अक्षरशः झिजविले! या श्रमांनीच की काय त्यांच्या आयुष्याची अखेर लवकर आली. परक्यांना मुकाबला केला, स्वकीयांचा विरोध मोडला, जिवाभावाच्या सवंगड्यांची ताटातूट मन घट्ट करून पचवली, कौटुंबिक कलह धीराने सहन केला, त्यातच त्यांना बंधू, पत्नी, पिता, माता आणि सहकारी यांच्या मृत्यूचे दुःख गिळावे लागले, पण हे सारे करूनही तो पुरुष-श्रेष्ठ खंबीरपणे अखेरच्या श्वासापर्यंत स्वराज्याचीच चिंता करीत राहिला! हा खरा कर्मयोगी!

श्रीशिवछत्रपतींच्या कर्मयोगी जीवनाची अखेर जवळ आली तेव्हा त्यांच्या मनाची अवस्था कशी झाली असेल!! आपण दीर्घ प्रयत्नाने जे आकाराला, नावारूपाला आणले, त्याविषयीचा स्वार्थी लोभ आपल्या मनाला शिवणारही नाही हे खरे — पण या साऱ्याचे भविष्य काय? — ही चिंता मात्र कदाचित त्यांच्या मनाला वाटली असेल! निदान स्वराज्याच्या भवितव्याविषयी स्वतःचे मन अखेरच्या क्षणी निश्चित करण्यासारखा एखादा विचार त्यांच्या मनात स्फुरला असेल! ही त्यांची मनोवस्था कल्पनेनं रंगविण्याची स्फूर्ती मनाला आली आणि ही नाटिका आकारली—

या कल्पनारम्य पण अवघड विषयाला नाट्यरूप देताना काही अवघड जागा आल्या — त्यासाठी काही विशिष्ट तंत्र वापरावे असे वाटले. त्यामुळे नाटिकेची प्रयोगक्षमता कायम राहिली. त्या तांत्रिक योजनेची थोडी ओळख पुढे करून देत आहे. याचा अर्थ दिग्दर्शकांच्या निर्मितीक्षमतेला बंदिस्त करणे असा मात्र नाही. तर ही त्यांच्याप्रमाणेच नाट्यचिंतन करणाऱ्या एका मित्राची कल्पना असा घ्यावा आणि 'न्यून तें पुरते — अधिक ते सरते' करून घ्यावे एवढीच नम्र विनंती!

जून १९७४ — आपला

१९/२७७, लोकमान्यनगर, पुणे ३० — डॉ. म. वि. गोखले

# प्रयोगासंबंधी थोडे--

सदर नाटिका सादर करताना रंगभूमीच्या उजव्या (प्रेक्षकांच्यादृष्टीने) भागात महाराजांचा बिछाना असलेला महालाचा देखावा कायम ठेवावा. या दृश्यातून (दृश्य क्र. १, ३, ५) मधून मधून दुसऱ्या काही दृश्यांकडे यावयाचे असल्याने हे दृश्य विंग पुढे सरकवून किंवा सरकत्या पडद्याच्या सहाय्याने बंद करता येईल अशी व्यवस्था हवी. शिवाय प्रकाशयोजनेची मदत घेता येईलच !

वरील मुख्य दृश्याखेरीज काही स्मृति-प्रसंग दाखविणारी दृश्ये (दृश्य क्र. २, ४, ६) सदर नाटिकेत आहेत. ती दृश्ये रंगभूमीच्या डाव्या (प्रेक्षकांच्या दृष्टीने) भागात घ्यावी. या दृश्यांची योजना फारशा सामानाखेरीज केलेली आहे. केवळ खांब, जंगल, इत्यादींच्या विंगा पुढे सरकवून आणि बाकीचा भाग अंधारात व एवढाच भाग प्रकाशात आणून हे दृश्य दाखविता येईल.

शिवाय **महत्त्वाची बाब** म्हणजे या नाटिकेत शिवाजीच्या भूमिकेसाठी दोन नटांची योजना करावी लागेल. एक प्रौढ शिवाजी आणि दुसरा तरुण शिवाजी असे दोन शिवाजी भिन्न दृश्यातून दाखविलेले आहेत. महालाच्या मुख्य दृश्यातील शिवाजी हा वय, आजारपण, रंगभूषा, पोषाख या दृष्टीने वेगळा व कायम ठेवला आहे. दुसरा शिवाजी तरुण, तडफदार असा स्मृतिप्रसंगात दाखवावयाचा आहे. शेवटच्या एकाच दृश्यात पंत आणि हंबीरराव एका दृश्यातून दुसऱ्या दृश्यात जात आहेत. पण त्यांच्या त्यावेळच्या नुसत्या उभ्या राहण्याच्या जागा बदलून दृश्य चालू करता येईल.

ध्वनिक्षेपक वापरल्यास दोन ठिकाणी प्रकाशयोजना आणि दृश्ये झाकणारे सरकते पडदे यांची तांत्रिक जोड हवी.

## – पात्र योजना – (प्रवेशानुक्रमे)

छत्रपती शिवाजीराजे : प्रौढ, आजारी, थकलेले (महालाच्या दृश्यात)

पंत : राजांचे पेशवे

हंबीरराव : राजांचे सेनाधिकारी

महादेव : राजांचा वैयक्तिक सेवक

बाजी : शिवाजीराजांचे एक कायस्थ सरदार

शिवाजी : तरुण, तडफदार शिवाजी (स्मृतिप्रसंगातील)

सैनिक : एक मावळा सैनिक

वैद्यराज : राजांचे खास वैद्य.

कृष्णाजीपंत : राजांचे प्रतापगडावरील कारभारी

संभाजी : संभाजी कावजी राजांचा शरीररक्षक

फुलादखान : औरंगजेबाचा सरदार

रघुनाथपंत व त्र्यंबकपंत : शिवाजीराजांबरोबर आग्र्याला गेलेले दोघे विश्वासू ब्राह्मण सहकारी

सय्यद : फुलादखानाचा सैनिक

फिरंगोजी : शिवाजीराजांचे भूपाळगडावरील किल्लेदार.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
रा. क्र. १५५९८० नों. दि २५।१।७५
वि. ........ आ.श्री क्र. ........

## दृश्य १ ले

(स्थळ : रायगडावरील एक महाल)

(शिवाजीराजे थकल्याप्रमाणे रंगभूमीवर येतात. थकलेले, दमलेले, खोकणारे राजे हंबीररावांच्या हातावर भार देऊन चालत आहेत. सोबत पंतही आहेत.)

**पंत** : एवढी प्रकृती अस्वस्थ असताना महाराजांनी विश्रांती घेण्याचं टाळू नये, आम्हाला काळजी वाटते.

**शिवाजी** : आपली काळजी पाहून आम्हालाही काळजी वाटते पंत—

**पंत** : महाराजांना काळजी वाटते?

**हंबीरराव** : आम्ही असताना महाराजांना काळजी ! मग आम्ही कशाला आहोत–?

**शिवाजी** : हंबीरराव, आम्हाला काळजी वाटते ती स्वराज्याची! पंत, तुम्ही आणि सारीच माणसं आमच्यापाशी जीव गुंतवून राहिली तर स्वराज्याची काळजी कोण करणार याचीच आम्हाला काळजी वाटते. (खोकल्याची उबळ येते)

(हंबीरराव पाण्याच्या सुरईतून पाणी ओतून पेला महाराजांपुढं धरतात. महाराज पाणी पितात. महाराज थकून बसतात.)

**पंत** : आज खोकल्याचा जरा जोर दिसतोय.

**हंबीरराव** आणि अंगसुद्धा कसकसलेलं आहे. मघाच माझ्या हाताला लागलं. महाराजांनी विश्रांती घ्यावी.

**शिवाजी** : हंबीरराव, आम्हाला विश्रांती घ्यायला सांगता आहात, पण विश्रांती मिळेल असं करत मात्र नाही तुम्ही कोणी!

**पंत** : आज महाराजांच्या बोलण्याचा रोख समजणं कठीण होऊन बसलंय ! महाराज, आपण स्पष्ट बोलत का नाही ?

**हंबीरराव** : काही चुकलं असलं तर संकोच न ठेवता महाराजांनी चूक पदरात घालावी अशी विनंती आहे आमची.

**शिवाजी** : पंत, हंबीरराव, आज पन्नास वर्षं आमच्या शरीराला आणि मनाला विश्रांती कशी ती ठाऊकच नाही. आम्ही देवाची आज्ञा मानून सतत हे श्रींचं राज्य उभं रहावं म्हणून धडपडलो. त्यासाठी आमच्यासारख्याच विचारांचे अनेक सवंगडी गोळा केले. त्या सवंगड्यांनीही– (खोकल्याची उबळ येते– पुन्हा पंत, हंबीरराव पाणी देणे, वारा घालणे इत्यादी करतात)

**पंत** : (थोडे बाजूला जाऊन) महादेव आत ये– (महादेव येतो) हंबीरराव, महाराजांचा जिरेटोप काढून महादेवाजवळ द्या. (हंबीरराव टोप महादेवाजवळ देतात. तो टोप घेऊन महादेव पलंगाजवळच्या छोट्या आसनावर ठेवतो) महादेव, वैद्यराजांकडे निरोप गेला ?

**महादेव** : होय. एवढ्यात वैद्यराज आलेच असतील– मी पाठवतो त्यांना–

(महादेव बाहेर जातो)

**पंत** . महाराजांनी आता न बोलता स्वस्थ पडावं अशी विनंती–

**शिवाजी** : नका पंत– आम्हाला बोलू द्या– आता मनात काही राहू नये–ठेवू नये असं वाटतंय!

**हंबीरराव** : पण महाराजांना बरं वाटलं की बोलता येईल! आताच–

**शिवाजी** : हंबीरराव–कुठलंही काम वेळीच करावं, ही आमची रीत तुम्हाला का ठावी नाही? अहो, तेच तर सांगत होतो– आम्ही गोळा केलेल्या सवंगड्यांनीही वेळेचं मोल जाणून आमच्यासाठी– आमच्या इच्छेसाठी–आमच्या शब्दासाठी आपले प्राणही खर्ची घातले– आणि स्वराज्याची सेवा केली. पण त्या बलिदानातून स्वराज्याविषयीची चेतना पेटायला हवी– शिवाजी भोसल्यावरचे प्रेम वाढून काय उपयोग– मग त्यांच्या बलिदानाला अर्थच उरणार नाही.

* *

दि.

## दृश्य २ रे

(रंगभूमीवरील डाव्या बाजूचा भाग प्रकाशमान होतो. पावनखिंडीचा परिसर भासेल अशा एका 'विंग' समोर शिवाजी आणि बाजीप्रभू देशपांडे येतात.)

**बाजी :** नका महाराज, आपल्यापाशी वेळ नाही. घाई करा. आपण निघा. मी इथं दगडासारखा छातीचा कोट करून उभा रहातो.

**शिवाजी :** काय सांगताहात बाजी! प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यात तुम्हाला ठेवून मी अलगद निघून जाऊ.

**बाजी :** होय महाराज होय! एका बाजीचं काय घेऊन बसलात. आपल्या नुसत्या इशाऱ्यावर हजारो बाजी उभे राहतील पण महाराज– ! मी हात जोडतो- माझं ऐका महाराज. गनीम जवळ येऊन ठेपलाय– वेळ घालवू नका–

**शिवाजी :** बाजी, धन्य आहे तुमची– ! पण स्वराज्याच्या हिशेबात तुमच्यासारख्या निष्ठावंताची खाती वाढायला हवीत. एका शिवाजी भोसल्याचं काय घेऊन बसलात– एक शिवाजी मेला–

**बाजी :** नका महाराज– असलं अभद्र बोलूसुद्धा नका. आपण असला विचारही करू नका– तातडीनं निघा. आमचा जीव तुमच्या सारख्यांवरून ओवाळून टाकण्यासाठीच आहे.

**सैनिक :** (एक सैनिक प्रवेश करतो) सुभेदार लगबग करा. गनीम नजीक येत आहे.

**बाजी :** महाराज– आता मात्र मी तुमचं ऐकणार नाही. आपण निघा– लाख गेले तरी लाखांचा पोशिंदा जगावा लागतो. चला रे मर्दानो, घ्या आपल्या जागा– महाराजांना पालखीत घालून पळा– पायाला वाऱ्याचे पंख लावून धावा– महाराज हा मुजरा घ्या–आपल्या जिवासाठी आणि स्वराज्यासाठी हा बाजी आज असा पराक्रम करणार–

**शिवाजी :** बाजी, कोणत्या शब्दात तुमचा निरोप घेऊ–? आमचा देह जरी

कुठेही गेला तरी मन सतत तुमच्याजवळ राहील. आम्ही आई जगदंबेची प्रार्थना करीत राहू– तुम्हाला यश येईल– खात्री आहे आमची–

**सैनिक :** सुभेदार, महाराजांनी लवकर निघायला हवं–

**बाजी :** महाराज–महाराज–आता अंत पाहू नका–माझा एवढा हट्ट पुरवा–आपण निघा– (शिवाजी जातो) माझ्या मर्दानो, एक गनीम वर चढू द्यायचा नाही. आपल्या प्रेतांनीं खिड भरून काढावी लागली तरी चालेल पण एक गनीम वर येऊ द्यायचा नाही–चला व्हा तयार–महाराज या बाजीचा हा शेवटचा मुजरा–जगलो वाचलो तरच–

**सैनिक :** चला सुभेदार–गनिमाचा पहिला हल्ला आला–
चला–जय भवानी–(तलवार उपसून जातो)

(अंधार होत जातो)

* *

## दृश्य ३ रे

(पुन्हा महालाचे दृश्य दिसू लागते. प्रकाश वाढतो)

(शिवाजीमहाराज बिछान्यावर बसलेले आहेत. आणि पंत, हंबीरराव बिछान्याजवळ उभे असतात. दृश्य सुरू होताना ते दोघे आपसात हळूहळू चर्चा करताना दिसतात.)

**हंबीरराव :** मी महादेवाला पाहून येतो.

**पंत :** ठीक आहे. एव्हाना वैद्यराज यायला हवे होते. पाहा बरं.

(हंबीरराव बाहेर जातात. महाराज उठतात.)

**शिवाजी :** पंत, आम्ही राज्याभिषेक करून राजपद स्वीकारलं. शंभूराजे युवराज झाले. या सर्वांपेक्षा महत्त्व आहे ते आमच्या नंतरच्या धोरणाला. त्या धोरणानंच स्वराज्याला आधार येईल.

**महादेव :** (प्रवेश करून) वैद्यराज आले आहेत.

**शिवाजी** : थोडा इथंच थांब महादेवा, तेव्हा पंत, आम्ही म्हणत होतो तें हे की आमच्यापाशी जीव गुंतवू नका. स्वराज्याचा विचार करा. आम्हीं सर्वांना सतत हेच सांगत आहोत की हे स्वराज्य तुम्हीच राखायचं आहे– आम्ही आज आहो उद्या नसू–

**पंत** : महाराज, आपण असं बोलू नये– प्रकृती स्वस्थ राखावी. त्यासाठी मनालाही विश्रांती द्यावी– महादेव, वैद्यराजांना पाठव. (महादेव जातो)

**शिवाजी** : पंत, आम्हाला वैद्यराजांच्या ताब्यात देता आहात तेव्हा आम्ही पुन्हा सांगतो आहोत, हे स्वराज्य तुम्हीच राखा. हेच आम्ही मागंही अनेकदा सांगितलं आहे–

(वैद्यराज येतात. बरोबर महादेव त्यांचा बटवा घेऊन येतो. वैद्यराज महाराजांना प्रणाम करून जवळ जातात. कपाळावर हात ठेवून पाहतात. चरकून हात काढतात.)

**वैद्यराज** : महाराज, ज्वराच्या स्थितीत आपण निखालस विश्रांतीच घ्यायला हवी. आपण काही दिवस बिछान्यात पडूनच राह्यलं पाहिजे. तरच आमच्या मात्रांचा आणि चाटणांचा उपयोग– पंत, महाराजांनी बिछान्यातून बाहेर पडू नये– ते हिताचं ठरणार नाही. महादेव, राजांचा पोषाख उतरव–

**शिवाजी** : (महादेव पोषाख उतरवू लागतो– अगदी प्रथम कमरेचा शेला, मग अंगरखा काढला जात असताना) वैद्यराजांनी म्हटलं तसं आम्ही बिछान्यातच स्वतःला कोंडून घेऊ– पण अशा स्थितीत असताना मागंही आम्ही म्हटलं तसं हे (वैद्यराज हंबीररावांना खूण करतात. दोघे मिळून महाराजांना हळूहळू बिछान्यावर नेऊन झोपवतात.)

**वैद्यराज** : महाराजांनी आता झोपावं– अजिबात उठू नये–

**शिवाजी** : (उशीवर डोके टेकत) तेव्हा मागंही जेव्हा आम्ही अफजलच्या भेटीला गेलो तेव्हा– (ग्लानी आल्याप्रमाणे पडतात) (वैद्यराज बटव्यातून औषधे काढू लागतात. पंत-हंबीरराव थोडे मागे बिछान्याजवळ जातात. महादेव एक सहाण घेऊन खाली बसतो) शिवाजी भोंसला असेल – नसेल पण हे स्वराज्य तुम्हीच राखा—हेच अफझलच्या भेटीला—

(हळूहळू अंधार होत जातो)

(आता अंधार होत असताना हे बिछान्याचे दृश्य एका सरकत्या पडद्याआड जाते. डाव्या बाजूच्या रंगभूमीवरील भागात प्रकाश येतो. तेथे तरुणपणातील शिवाजीराजे, कृष्णाजीपंत, संभाजी कावजी आणि एक सैनिक असे उभे आहेत.)

* *

## दृश्य ४ थे

(शिवाजीराजांचे कपडे करून झाले आहेत, डोक्यावर जिरेटोप आहे. सैनिक राजांना एक बिचवा देतो. तो घेऊन राजे हाताच्या बाहीत ठेवतात. मग सैनिक वाघनखे देतो. राजे ती हाताच्या बोटात घालून मूठ मिटवून एकदा पाहतात.)

**शिवाजी :** कृष्णाजीपंत, काल ठरविलेल्या पोषाखाप्रमाणं सर्व झालं ना?

**कृष्णाजीपंत :** होय महाराज. सर्व वस्तू यादीबरहुकूम काढलेल्या होत्या.

**संभाजी :** महाराज, संगत घ्यायची मानसं वी बाहेर येऊन थांबलीत.

**शिवाजी :** ठीक. आम्ही देवीला नमस्कार करून निघतोच आहोत. पंत, आम्ही खानाच्या भेटीला जातोय. खानाचा हेतू सरळ नाही. जर आमचं काही बरंवाईट झालंच तर हिम्मत सोडू नका——

**कृष्णाजीपंत** : जाताना हे अमंगल विचार कशाला – आपण यशस्वीच व्हाल !

**शिवाजी :** पंत, आम्ही खानाला भेटण्याचा निर्णय केला तो आमचं दिल डरपोक नाही म्हणूनच ! आम्ही यश मिळविण्यासाठीच जातो आहो. आई जगदंबा आमची पाठीराखी आहे. पण पंत, यशापयशाची चिंता करणं कोणाही पुरुषाचं कर्तव्यच असतं–! आम्ही आमच्यासाठी नाही स्वराज्यासाठी हे सांगत होतो– आमच्यामागे बाळराजे आहेत त्यांना सांभाळा, नेताजी सरनोबतांना राज्याचे धुरीण करा– आईसाहेबांना विचारून स्वराज्याचा कारभार चालू ठेवा ! आहे ते तुम्ही सर्वांनी राखायचे आहे !

**कृष्णाजीपंत** : महाराजांनी विश्वास ठेवावा ! (पंत डोळे पुसतात) (सर्व जातात)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १५५६० नों. दि २५।६।७०
वि. ....आ/वा.... क्र. ......

### दृश्य ५ वे

(पुन्हा महाराजांच्या बिछान्याचे दृश्य दिसू लागते. वैद्यराज, पंत आणि हंबीरराव रंगभूमीच्या मध्यावर येऊन चर्चा करीत राहतात तेव्हा महाराज झोपलेले असतात. महादेव तेवढा बिछान्याजवळ थांबलेला असतो.)

**वैद्यराज** : पंत, आम्ही वारंवार हेच सांगत आहो की महाराजांनी अगदी पूर्ण विश्रांती घेतली पाहिजे. ज्वर कमी व्हावा म्हणून आम्ही उपाययोजना करणार– तेवढंच आमच्या हाती आहे. रुग्णानं साथ दिली नाही तर औषधयोजना तरी कुठंवर पुरी पडणार ?

**पंत :** आपल्या म्हणण्यात गैर काहीच नाही. पण महाराजांना सांगूनही ते जेव्हा ऐकत नाहीत तेव्हा आमचीही मती कुंठित होते.

**हंबीरराव** : सारखा विचार केल्यानं महाराजांचं मन अस्वस्थ होतं त्यावर इलाज तरी आपण काय करणार ?

**वैद्यराज** : मनाची अस्वस्थता हेच तर प्रमुख कुपथ्य ठरतंय !

(शिवाजीमहाराज 'आमचा भरोसा तुमच्यावर' असे अर्धवट गुंगीत म्हणतात त्याबरोबर सर्वजण बिछान्याकडे जातात.)

**शिवाजी :** आईसाहेबांचा मनःक्षोभ आम्हाला समजतो पंत, पण आम्ही तरी काय करणार ! राजकारणात असली अरिष्टं अंगावर घ्यावीच लागतात. आम्ही स्वतः येऊन आईसाहेबांची समजूत काढू—

**वैद्यराज** : महाराज, सावध व्हा, आपण जागे झालात का ?

**शिवाजी** : (एकदम उठून बसून) पंत, आम्ही दिल्लीश्वर अलमगीराच्या भेटीला निघालो तेव्हा शंभूराजांना संगती न्यायला हवंच होतं हे तुम्हाला तरी पटलं ना !

**पंत** . महाराज, आपण आता त्या गतगोष्टींसाठी विचार करून व्यर्थ शीण का करता !

**शिवाजी** : हंबीरराव, आमची हिरोजी आणि मदारी यांना बरोबर नेण्याची योजना कशी चोख होती नाही !

**हंबीरराव** : महाराज, आपल्या सर्वच योजना चोख होत्या म्हणून तर जग-दंबेनं सर्वच डाव यशस्वी केले–पण आता त्यांची याद करून का शिणायचं ?

**शिवाजी** : पंत, हंबीरराव आम्हाला यश मिळालं ती जगदंबेची कृपा खरीच! पण हे घडण्यामागं स्वराज्याचं हित पाहणारी दिव्यदृष्टी होती हेही खरं ! हे राज्य व्हावं ही श्रींचीच इच्छा !

**वैद्यराज** : महाराज, आपण विश्रांती घेतली नाहीतर आपल्याला –

**शिवाजी** : त्रास होईल. असंच ना ! वैद्यराज, आमच्या त्रासाच काय घेऊन बसलात. आग्र्याच्या प्रसंगातून आम्ही आलो सुखरूप निघून पण–आमच्या माणसांनी केवढा त्रास भोगला मागं–रघुनाथपंत–त्र्यबंकपंत ! महादेव पाणी दे–(पाणी पेल्यात भरून महादेव महाराजांकडे देत असतानाच हळूहळू अंधार होतो. बिछान्याचे दृश्य सरकत्या पडद्याआड जाते–आता रंगभूमीचा डावा भाग प्रकाशित होतो. तेथे फुलादखान हातात आसूड घेऊन उभा आहे.)

* *

## दृश्य ६ वे

(स्थळ :– आग्र्यातील एक तुरुंग. फुलादखान आसूड घेऊन उभा आहे)

**फुलादखान** · पेश करो उन बम्मनोंको !

(दोघे मुसलमान पहारेकरी रघुनाथपंत, त्र्यबंकपंत या दोघांना फक्त धोतर नेसलेल्या अवस्थेत उघडे बोडके असे साखळदंडांनी बांधून घेऊन येतात.)

**फुलादखान** : क्यों बे ! जबान खोलना है या नही ? आप लोग वैसे नही

मानेंगे। सय्यद यह चाबूक नमकके पानीमे भिगाकर ले आव ।

(सय्यद हा पहारेकरी आसूड घेऊन जातो) तुम लोग जबतक सिवाजीका ठिकाना और भागनेकी तरतीब नही बतायेंगे तबतक तुम्हारी चमडी निकलनेतक मार खाते रहोगे। याद रखना। (फुलादखान रघुनाथपंत यांच्याजवळ जाऊन त्यांची शेंडी पकडून डोके उचलतो पण ते मान उचलण्याखेरीज काही बोलत नाहीत.) नही मानोगे। तू रे बम्मन। (त्र्यबंकपंताच्या मानेवर आघात करीत) नही खोलता जबान। ठीक है। सय्यद, (सय्यद आसूड घेऊन येतो) बांधो इनको उस खंबेके साथ। (पहारेकरी त्या दोघांना आतल्या बाजूस नेतात. फक्त दोरी मधून मधून दिसते. बांधलेले दोघे दिसत नाहीत.)

**सय्यद** : हुजूर ।

**फुलादखान** : गिनके लगातार पचास एक एक को ।

(सय्यद आसुडाचे फटके मारतो आहे. रघुनाथपंत, त्र्यबंकपंत विव्हळताहेत. फुलादखानाचे हसणे चालू आहे, असा प्रकार चालू असतानाच हळूहळू अंधार होतो.)

(दृश्य बदलते)

* *

## दृश्य ७ वे

(स्थळ :– पुन्हा बिछान्याचे दृश्य दिसू लागते.)

(महाराज पाण्याचा पेला हातात घेतलेले. जवळ महादेव उभा. शेजारी वैद्यराज, पंत, हंबीरराव उभे आहेत.)

**शिवाजी** : (पाणी पिऊन पेला महादेवाकडे देतात.) त्यांच्या अंगावर फुटलेल्या एकेका फटकाऱ्याच्या वेदना आमच्या अंतरात अजूनही सलताहेत! का एवढी कठोर, निग्रही बनली ही माणसं! केवळ स्वराज्यासाठीच ना! मग आम्ही तरी काय सांगतो आहोत! एक शिवाजी भोंसला म्हणजे स्वराज्य

नाही. या साऱ्यांच्या कष्टातून उभं राहिलेलं स्वराज्य पंत तुम्हीच राखायचं !

**पंत** : महाराज, आमच्या निष्ठेची आपणाला शंका का वाटते आहे ?

**शिवाजी** : नाही पंत ! तुमच्या निष्ठेची शंका नाही आम्हाला. पण तुमच्या आणि साऱ्या मंत्र्यांच्याच निष्ठा स्वराज्याकडं वळवा, असं आम्ही सांगतोय.

**हंबीरराव** : पण महाराजांच्या मनाला त्याविषयी शंका का वाटावी ?

**शिवाजी** : कारण, कारण अजून तुमचा जीव शिवाजी भोंसल्याच्याविषयी कळवळतोय म्हणून ! शिवाजी भोंसल्याचा मुलगा म्हणून तुम्ही लोक अजून गलबलून उठता म्हणून ! आमचे फिरंगोजी कसे वागले आणि—

(अंधार होऊन दृश्य बदलते)

* *

## दृश्य ८ वे

(रायगडावरील एक भाग—साधारणपणे महालाचा खांब असलेली एखादी विंग पुढे रंगभूमीवरील डाव्या बाजूला पुढे ओढलेली. तिथे शिवाजीराजे उभे आहेत. पंत आणि हंबीरराव प्रवेश करतात.)

**पंत** : महाराज, आज आमच्यावर एक वाईट बातमी सांगण्याचा प्रसंग आला आहे.

**हंबीरराव** : महाराज, भूपाळगड पडला, फिरंगोजी आले आहेत.

**शिवाजी** : येऊ द्यात त्यांना इकडे. (हंबीरराव थोडे मागे जाऊन खुणावतात.)

**फिरंगोजी** : (प्रवेश करून) महाराज, ह्या अपेशी फिरंगोजीचा मुजरा घ्या.

**शिवाजी** : अपेशी— ते काय म्हणून—लढाईत हारजीत चालायचीच. (ताडकन वळून जळजळीत नजरेने फिरंगोजीकडे पाहतात.) फिरंगोजी, तुम्ही आम्हाला दिसताहात ते अपराधी फिरंगोजी.

**फिरंगोजी :** अपराधी ? महाराज!

**शिवाजी :** होय ! अपराधी ! तुमच्यातला पराक्रम वाढत्या वयाबरोबर ओसरला एवढंच आम्हाला तुमच्या अपयशानं वाटलं, पण–पण तुम्ही स्वराज्याचा अपराध करून निमकहराम झालात याची आम्हाला फार फार खंत वाटते.

**पंत** महाराज, आपण शांत व्हा. हकीगत–

**शिवाजी** : शांत होऊ ! पंत, आमच्या स्वप्नी असलेल्या श्रींच्या स्वराज्यासाठी आम्ही गोळा केलेली ही दगडासारखी चिरेबंद माणसंच असा अंगचुकारपणा करू लागली तरी–तरीसुद्धा आम्ही शांतच राहू ?

**हंबीरराव** : महाराजांचा काहीतरी गैरसमज–

**शिवाजी** : गैरसमज कसला ? आपल्या साऱ्यांच्या कष्टानं उभं झालेलं हे स्वराज्यमंदिर ! त्या मंदिरात अभद्राची पावलं उमटायला कारण झालेले फिरंगोजी आम्हाला अपराधीच वाटतात.

**फिरंगोजी :** मी अपराधी ठरलो तर हवी ती शिक्षा भोगायला तयार आहे. महाराज, ईश्वरसाक्ष सांगतो, स्वराज्याशी इमान राखून गनिमाला भिडताना आजवर या फिरंगोजीचं मन कधीच कचरलं नाही–पण–पण महाराज यावेळचा प्रसंगच वेगळा होता–यावेळी प्रत्यक्ष शंभूराजे–

**शिवाजी** : खामोश ! तुम्हाला काय वाटलं ! शंभूराजांचं नाव घेतलं की आम्ही स्वराज्याचं हित, न्यायनीती, कर्तव्य पार सारं विसरून जाऊ ! त्या शंभूराजाचं आणि आमचं नातं काहीही असलं तरी ते शिवाजीपुरतं राहील ! तुमच्यासारख्या स्वराज्याच्या रखवालदारांनी त्याची दखल घ्यायचं काय कारण ?

**पंत** महाराज, शंभूराजांच्या ठायी प्रयत्नानं आम्ही सर्वांनी ज्या निष्ठा जडवल्या त्या इतक्या सहजासहजी–

**हंबीरराव** महाराज, शंभूराजे पोर वुद्धीनं चुकले तरी फिरंगोजींसारख्या–

**शिवाजी** : पंत, हंबीरराव ! तुम्ही काय बोलताहात ते आमच्या लक्षातच येत नाही. शंभूराजे युवराज म्हणून भूपाळगडावर जाते आणि त्यावेळी फिरंगोजींकडून काही अपमानकारक घडतं तर तुम्ही आम्ही कोणीच त्यांची गय केली नसती–खरं ना ?

**पंत :** नि.संशय !

**हंबीरराव :** स्वराज्याचीच ती आगळीक मानली गेली असती.

**शिवाजी :** मग आताच्या परिस्थितीत स्वराज्याचीच आगळीक या फिरंगो-जींकडून घडली स्वराज्याच्या सेवेत त्यांनी हयगय–

**फिरंगोजी :** नाही महाराज—नाही—

**शिवाजी :** (आवाज चढवून) खामोश ! भूपाळगडाचे किल्लेदार फिरंगोजी एका स्वराज्याच्या शत्रूच्या सरदाराशी– सेनापतीला फितूर झाले ही काय स्वराज्याशी, इमानदारी झाली ?

**फिरंगोजी :** शत्रूला फितूर झालो मी ?

**शिवाजी :** बेशक ! संभाजी भोंसले नावाचा दिलेरखानाचा एक सेनापती आमच्या स्वराज्यातील भूपाळगडावर चालून आला आणि त्याच्या हाती गडाची जिम्मेदारी सोपवून आमचे गडकरी गडाबाहेर पळून जातात–

**फिरंगोजी :** पण शंभूराजे जातीनं–

**शिवाजी :** नाही नाही शंभूराजा भोंसला आमचा वैरी म्हणून–

**हंबीरराव :** पण महाराज, फिरंगोजी शंभूराजांशी मुकाबला करते तर–

**शिवाजी :** तर काय ? फिरंगोजी या मुकाबल्यात पडले असते तर स्वराज्याच्या सेवेत त्याचं सोनं झालं म्हणून कीर्त झाली असती. आणि त्यांनी वैऱ्याला नेस्तनाबूत केलं असतं तर स्वराज्यावरचं संकट टाळल्याचं श्रेय त्यांच्या पदरी पडलं असतं–

**फिरंगोजी :** या–या हातांनी शंभूराजांवर–

**शिवाजी :** हां हां ! त्याच घडीला भर सभेत आम्ही आपल्याला मानमरातब बहाल केले असते–आणि खाजगी महालात नेऊन पुत्रशोक व्यक्त करताना तुमच्याच खांद्यावर डोकं ठेवून आसवं ढाळली असती !

**पंत :** धन्य धन्य आहे महाराजांच्या स्वराज्यनिष्ठेची !

**शिवाजी :** पंत, मोंगलाना मिळालेले शंभूराजे गडावर चालून आले की आमच्या फिरंगोजींसारखे निष्ठावंतही गड सोडून जातात हे पाहिल्यावर स्वराज्याचे शत्रू आनंदानं नाचू लागतील. स्वराज्याचं मंदिर असं वागून उध्वस्त करायचा आपल्यापैकी कोणालाच अधिकार नाही.

**फिरंगोजी :** (महाराजांचे पाय धरून) आम्ही– आम्ही दोषी आहोत महाराज!

**शिवाजी** . दोष मान्य करता तशीच शिक्षा मान्य कराल ?
**फिरंगोजी** : अगदी आनंदानं महाराज! स्वराज्याच्या हितासाठी मरणसुद्धा मी आनंदानं स्वीकारीन–
**शिवाजी** : (एकदम फिरंगोजीना उठवून) शाबास! फिरंगोजी शाबास! आमचा पुत्र असो की आम्ही स्वत: असो स्वराज्यासाठी निष्ठा बांधा– स्वराज्याच्या वैऱ्याचा मुलाहिजा न ठेवता हे स्वराज्य राखा! स्वराज्यातल्या कुठल्याही गडकऱ्याची निष्ठा डळमळू नये म्हणून आपण देहान्ताची शिक्षा भोगून एक आदर्श निर्माण करा.
**फिरंगोजी** : मला एकदम मान्य आहे महाराज!
**शिवाजी** . धन्य आहात फिरंगोजी! (दु:ख लपविण्यासाठी वेगाने मान वळवून आत निघून जातात. यानंतर अंधार होऊन दृश्य बदलते)

## दृश्य ९ वे

(पुन्हा महाराजांच्या महालाचा भाग दिसू लागतो.)

(महाराज बसलेले असून पंत आणि हंबीरराव खालच्या मानेने उभे आहेत)

**पंत** : पण महाराज जशा स्वराज्याशी तशाच आपल्याशीही निष्ठा बांधलेल्या असताना एकाएकी–
**शिवाजी** पंत, मग आम्ही इतकी वर्ष साऱ्यांना काय सांगतो आहोत? आमच्याशी निष्ठा ठेवा ती स्वराज्याचा राजा म्हणून! पण स्वराज्याच्या हिताचा प्रश्न आला तर प्रत्यक्ष राजालाही जाब विचारायचा अधिकार आठवा– वापरा–
**हंबीरराव** महाराजाचे विचार खरोखर फार मोलाचे आहेत परंतु हे सारं एकदम अगवळणी पडायला तितकंच कठीण आहे.
**शिवाजी** : हंबीरराव, गगनाला गवसणी घालण्याचं सामर्थ्य अंगी बाळगणारे तुम्हीच असं नेभळ्यासारखं बोलू लागलात म्हणजे शर्थच झाली. आमचे

सेनापती एवढे दुबळे कसे?

**पंत :** महाराज, आपले विचार आम्ही समजलो पण कृपा करून आता आपण विश्रांती घेऊन आधी पूर्ण बरे व्हा. काही दिवस आपण राज्यकारभारातूनही लक्ष काढावं – आम्ही तो पाहू–

**शिवाजी** : शाबास पंत ! आता खरे आमचे पेशवे शोभलात ! आमचा तुमच्यावर, साऱ्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. स्वराज्य ही तुमची आमची सर्वांची एकमेव निष्ठा असावी तिथं अधिकाराचा, नात्याचा, जाती-पातीचा, धर्माचा कशाचाही मुलाहिजा ठेवला जाऊ नये हीच आमची इच्छा आहे.

**हंबीरराव** : महाराज, पंतांनी सांगितल्याप्रमाणं सर्व तजवीज होईल. आपण मात्र मन स्वस्थ ठेवून विश्रांती घ्यावी.

**शिवाजी** : होय हंबीरराव ! आम्ही आता विश्रांती घ्यायचं ठरवलंय. श्रीशैलाला आम्ही तेच म्हणालो. पण इथवर गुंतवणूक व्हायची होती. श्रींची तशीच इच्छा होती. इलाज नाही. पण आता तुमच्या आत्मविश्वासानं आमचाही विश्वास दुणावला आहे. (जबरदस्त उबळ येते.)

**पंत** : महाराज, महाराज ! (पाण्याच्या सुरईकडे जातात तेव्हा महादेवानं पेला भरलेला असतो. तो पेला घेऊन लगबगीनं महाराजांना देतात) हंबीरराव, आता प्रथम महालातला राबता बंद करा. तुमच्या परवानगीखेरीज कोणालाही येऊ देऊ नका. केवळ वैद्यराजांचा अपवाद करा.

**शिवाजी** : पेशव्यांची आज्ञा जरूर अंमलात आणा– आम्हीही विश्रांतीसाठी उत्सुकच आहोत. आम्हाला आता चिंतनाची संधी मिळेल– आम्ही नसलो तरी स्वराज्याचा कारभार बेकसूर चालतो हेही जगाला दिसेल. पंत, हंबीरराव आम्ही बोललो ते यासाठीच ! हे श्रींचं राज्य आहे– हे तुम्हा सर्वांचं राज्य आहे– हे तुम्हीच राखा. हे तुम्हीच वाढवा– तुम्हीच राखा ! !

(महाराज आपणहून आडवे ह

(पंत महादेवाला काही सूचना देत असतानाच

पडदा पडतो.

IRBK-0115560

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.